सकाळ

# नव्या जगात बहुआयामी संशोधन आवश्यक : डॉ. शिर्के

## वाणिज्य, व्यवस्थापनातर्फे लघुकालिक कार्यक्रम

कोल्हापूर, ता. ८ : नव्या जगात भारतीय अर्थव्यवस्थेला गती देणारे बहुआयामी संशोधन आता आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे आयोजित लघुकालिक कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी, तर होते. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, "संशोधन आराखडा व विदासंकलन हे संशोधनाचे हृदय असते. तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत सामाजिक शास्त्रातील व वाणिज्य विषयातील शिक्षकांनी दक्ष असायला हवे."

प्रा. पाटील म्हणाले, "युवकांच्या प्रज्ञेची मशागत करण्यासाठी व क्षमता विकसित करण्यासाठी असे प्रशिक्षण शिक्षकांना दिले पाहिजे. त्यातूनच नवोपक्रम व संशोधन उदयास येते आणि समस्या सोडविण्यास उपयुक्त ठरते."

प्रा. महाजन म्हणाले, "बहुआयामी विषयांचा अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून करण्यासाठी व वाणिज्य, व्यवस्थापन व इतर शिक्षकांच्या क्षमता विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सामाजिक समस्या सोडविण्यासाठी ध्येयांची प्राप्तीसाठी अशा बहुआयामी संशोधनाचा वापर केला पाहिजे." प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले.

लोकमत

# सुधीर पोटे यांना आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार

## व्ही. बी. पाटील : रविवारी वितरण होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोल्हापूरच्या अभिजात



शास्त्रीय संगीत परंपरेतील मानाचे पान व जयपूर-अत्रौली घराण्याचे ज्येष्ठ गायक सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्या नावे दिला जाणारा सरदार आबासाहेब मुजुमदार रसिकराज पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित सुधीर पोटे यांना जाहीर झाला आहे. गायन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत त्यांच्या नावाची घोषणा केली.

रविवारी (दि.१३) राम गणेश गडकरी सभागृहात सायंकाळी साडे पाच वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. पुरस्कार वितरणानंतर कानडा काफिरा हा कानडा रागातील प्रकारांवर आधारित कार्यक्रम सादर होणार आहे. रसिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन देवल क्लब व मुजुमदार कुटुंबाच्यावतीने करण्यात आले आहे.

11 FEB 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पश्चिम घाट संवर्धन काळाची गरज : प्रा. सामंत

## विद्यापीठ पर्यावरण शास्त्र विभागातर्फे व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पश्चिम घाटाच्या रूपाने निसर्गाचा अमूल्य वारसा प्राप्त झाला आहे. सध्या वाढते खाणकाम, दगड उत्खनन, जंगलतोड व अतिक्रमण तसेच जमिनीच्या वापरातील बदलामुळे पश्चिम घाटाला मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पश्चिम घाट संवर्धन ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ प्रा. जय सामंत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ पर्यावरण शास्त्र विभागातर्फे यूजीसी- स्ट्राईड प्रकल्पांतर्गत तीन दिवसीय ऑनलाईन व्याख्यानमालेस प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ जय सामंत यांचे 'पश्चिम घाट : एक महत्त्वाची जीवन समर्थन प्रणाली, तिचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर व्याख्यान




झाले. प्रा. सामंत यांनी पश्चिम घाटाचे महत्त्व त्यासंबंधीचे विविध आराखडे, त्याचा परिणाम यावर व्याख्यानात प्रकाश टाकला. प्रा. सामंत म्हणाले, शेतीमधील पारंपरिक पिकांऐवजी नगदी पिकांच्या लागवडीमुळे सह्याद्रीच्या परिसंस्थेवर विपरित परिणाम होत आहे. पर्यटकांचा वाढता चंगळवाद, निष्क्रियपणा यामुळे परिसंस्था धोका आणखीच वाढला आहे. पुढील पिढीसाठी हा वारसा जतन करण्यासाठी याची जपणूक महत्वाची आहे.

विभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता सरकाळे यांनी सूत्रसंचालन केले पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

11 FEB 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जी. डी. यादव यांना अमेरिकन सन्मान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

पद्मश्री पुरस्कार विजेते कोल्हापूरचे सुपुत्र प्रोफेसर डॉ. जी. डी. यादव यांना अमेरिकन नॅशनल ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग या जगप्रसिद्ध संस्थेची फेलोशिप जाहीर झाली आहे. २ ऑक्टोबरला गांधी जयंतीच्या दिवशी वॉशिंग्टनमध्ये होणाऱ्या सोहळ्यात यादव यांना सन्मानित केले जाणार आहे. या फेलोशिपमुळे जगभरातील मान्यवरांच्या यादीत डॉ. यादव यांचा समावेश झाला आहे.

अमेरिकन नॅशनल ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग ही संस्था जगातील विविध विज्ञानशाखातील संशोधन करणाऱ्या संस्थांपैकी सर्वात प्रभावशाली संस्था म्हणून ओळखली जाते. या संस्थेच्या वतीने संशोधन करणाऱ्या, संशोधनात योगदान देणाऱ्या आणि



- **युएस नॅशनल ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंगची फेलोशिप जाहीर**
- **वॉशिंग्टनमध्ये २ ऑक्टोबरला होणार वितरण सोहळा**

संशोधानातून उद्योग समूहाची उभारणी करणाऱ्या मान्यवरांचा फेलोशिप देऊन सन्मान केला जातो. याआधी बावीस भारतीयांना ही फेलोशिप मिळाली आहे.

पान ६ पहा

# डॉ. जी. डी. यादव यांना अमेरिकन सन्मान

**पान १ वरून**

त्यामध्ये टाटा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा रतन टाटा, रिलायन्स उद्योग समूहाचे मुकेश अंबानी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, इन्फोसिसचे नारायण मूर्ती, डॉ. एम. एम. शर्मा, डॉ. किरण मुझुमदार-शॉ, जे. बी. जोशी, टाटाचे चंद्रशेखर, मायक्रोसॉफ्टचे सीईओ सत्या नडेला या भारतीयांसह अमेरिकेतील टेस्ला कंपनीचे प्रमुख इलॉन मस्क यांचा समावेश आहे. या यादीत आता डॉ. यादव यांचा समावेश झाला आहे.

अर्जुनवाड (ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) गावचे सुपुत्र असणाऱ्या डॉ. यादव यांनी केमिकल इंजिनिअरिंग क्षेत्रात देश आणि विदेशात संशोधक म्हणून ख्याती संपादन केली आहे. मुंबईत इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिक्षण संस्थेची स्थापना करण्याचे श्रेय डॉ. यादव यांना जाते. तेच या संस्थेचे पहिले संस्थापक कुलगुरूही होते. विद्यापीठाचा दर्जा असणाऱ्या या संस्थेच्या माध्यमातून डॉ. यादव यांनी हजारो विद्यार्थ्यांना संशोधन आणि प्रकल्प कार्यातही मार्गदर्शन केले. संशोधक असणाऱ्या डॉ. यादव यांच्या नावावर तब्बल ११३ पेटंट आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल १०४ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. केली आहे. आपल्या संपूर्ण देशात डॉ. यादव यांचा हा विक्रम आहे. त्याचबरोबर डॉ. यादव यांनी ४९१ रिसर्च पेपरही (शोध निबंध) सादर केले आहेत. सध्या ते हायड्रोजन आणि कार्बनडायऑक्साईड संदर्भात स्वतंत्र असे संशोधन करत आहेत. भारतीय राष्ट्रीय अभियांत्रिकी अकादमीतर्फे (इंडियन नॅशनल ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग) दिला जाणारा यंदाचा प्रोफेसर जयकृष्ण स्मृती पुरस्कार त्यांना ऑक्टोबर २०२१ मध्ये जाहीर झाला होता. भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कारानेही गौरविले आहे. अनेक प्रकल्पातही ते मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या सल्लागार समितीवरही डॉ. यादव अमूल्य योगदान देत आहेत.